**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011**
**ISSN:- 2230-7850** Available online at www.isrj.org

# पानझड (२०००) - ना. धों. महानोर

**प्रा. गणपत काशिबा हराळे.**
**साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख**
**नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, सांगली.**

***प्रस्तावना :***

नामदेव धोंडो महानोर (१६ सष्टेंबर १९४२) यांचा पानझड हा कवितासंग्रह सन १९९७ साली प्रसिध्द झालेला आहे. त्यांचे शनातल्या कविता (१९६७) वही (१९७१), पावसाळी कविता (१९८२) अजिठां (१९८४), प्रार्थना दयाघना(१९९०), तिची कहाणी (१९९९), गाथा शिवरायाची (१९९८) हे कवितासंग्रह आहेत. राजमान्यता लोकमान्यता आणि रसिकमान्यता लाभलेला पानझड हा महानोरांचा नववा काव्यसंग्रह आहे. पानझड या कवितासंग्रहात बिनशीर्षकाच्या ८१ कविता संग्रहित केलेल्या आहेत. सत्तालोलूपत्ता, व्देष, देवेदावे या सर्व गोष्टींनी माणसातील माणूसकीची जी पानझड होत होती तिचे प्रतिकात्मक चित्रण पानझड मधील कवितांतून आले आहे.

पानझड (१९९७) या कवितासंग्रहात ना.धों. महानोरांची गाजलेली चित्रपट गीते, गीतांच्या वळणाऱ्या कविता, संत परंपरेशी जोडणारे आणि मनाला घायाळ करणारे असे पालखीचे अभंग आहेत. पानझड या संग्रहात ना. धो. महानोरांच्याआतापर्यंतच्या संग्रहातील कवितांचे सर्व विशेष जाणवतात. ना. धों. महानोरांच्य पानझड मधील कवितांमध्ये उदासवाणे अनुभव, निसर्गप्रतिमांतून भेटणारी तर कधी सोज्वळ शृंगारातून दिसणारी स्त्रीरुपे, निसर्गचित्रे, सभोवतालचे ग्रामवास्तव आणि पालखीचे अभंग अशा स्वरुपचे अनुभव व्यक्त झालेले आहेत.

पानझड मधील कविता या तीन गटात विभागल्या आहेत. पहिल्या गटातील कविता शेतकऱ्याच्या भोगवटा मांडणारी आणि दु:ख व उदास अनुभवाच्या कविता आहेत. दुसऱ्या गटातील कविता स्त्री जीवनाचं भलं-बुरं मनोगत सांगणारी, कधी लावणी-गीताच्या वळणाने जाणारी आहे. स्त्रीजातीबद्दल असणाऱ्या अपार कळवळयाने लिहिलेली ही कविता आहे. या संग्रहाच्या सुरुवातीला जी अर्पणपत्रिका जोडली आहे. ती या संदर्भात फार बोलकी आहे. ना.धों. महानोरांनी हा संग्रह आपल्या पत्नीला सौ. सुलोचना महानोर यांना अर्पण करताना लिहिंल आहे....

> निसर्गात जरी झाडाच्या आधारानं
> वेल वाढत असली
> तरी आपल्या चाळीस वर्षाच्या आयुष्यात
> वेलीच्या आधारानंच
> झाड जगण्या वाढण्याचं अघटित घडले ते तुझ्यामुळेच...
> म्हणून हा संग्रह तुझ्यासाठीच

यावरून त्यांच्या स्त्रीजातीकडे पाहण्याचा स्वच्छ दृष्टिकोन आणि तो स्वच्छपणे मांडण्याची भूमिका या कविता संग्रहात पहावयास मिळते. तिसऱ्या गटात संध्या छायांना सामोरे जाताना होणारी विठ्ठल तू माझा सोबती जिवाचा ही जाण प्रकट करणारे पालखीचे अभंग यांचा पानझड मध्ये अंतर्भाव केलेला आहे.

पानझड मधील प्रारंभीच्या काही कविता आणि पालखीचे अभंग मधील काही कविता या वेदनेचा सूर छेडणाऱ्या कविता आहेत.

> पीठ गळे जात्यातून
> तसं पाणी डोळयातून
> आई करपले हात
> तुझे भाकरी भाजून....(कविता क्र.१)

या दु:खार्त ओळींना पानझड च्या कवितेची सुरुवात होते. पानझड मधील कविता आईच्या दुखाचे डोळाभर पाणी आणि एकूणच आयुष्याची दाटलेली कहाणी घेउन आलेली कविता आहे. ग्रामीण वास्तवाचे चित्रण करताना एकयाचंच नव्हे तर समूहाचं पर्यायाने सर्वांचे दुख कवेत घेण्याची असोशी कवितेला आहे. शेतकऱ्यांच्या कथा वेदना मांडताना कवी म्हणतो.

जन्माला आमुच्या काजळी दुःखाच्या वेदना
सांभाळा आता करुणाघणा विझणाऱ्या या मना...(कविता क्र.५)

आमुच्या या शब्दातून समस्त शेतकरी वर्गाचे दुःख आणि दारिद्रय कवीने मांडलेले आहे.

आज माणूस हा माणसांपासून दुरावत असून माणसा माणसांतील नाती हरवत चालेली आहेत. आज खेडयापाडयात माणूसपणा विसरत चाललेली समाजव्यवस्था पाहून कवीचे मन उदास होते. महानोर लिहितात.

कुठे शोधावा माणूस, रिते कोस -कोस
दूर गणगोत, माझे शब्दही उदास
देवळात मंद दिवा, काळोखाच्या पाशी
ओठातली ओवी गेली विझून शब्दांशी (कविता क्र.०१)

जातीय तणाव, माणसांमधला विव्देष, श्रुद्र राजकारण यामुळे ज्ञानोबा, तुकोबांची शिकवण पारावर राहिली नसल्याची खंत कवीच्या मनाला सतत बेचत राहते. राजकारणाने समाज जीवन गढूळ करुन टाकलेले आहे. या राजकारणाबद्दल ते उव्देगाने लिहितात.

खेडयाकडे चला
कुणसाठी, कशासाठी?
अडाण्यांच्या हाती जोर
काळीभोर काठी
त्यांच्या पडसाऊलीत
लांडग्यांचा तळ
स्वार्थासाठी, केली माणसं गढूळ.

अशा पध्दतीने समाकालीन वास्तव अतिशय ताणतणावाचे आणि अत्यंत गुंतागुंतीचे होऊ लागल्याची खंत कवी ना.धों. मनोहर व्यक्त करतात. थोडक्यात पानझड च्या पहिल्या विभागातील कविता या काहीसा आर्त, दुःखद आणि जीवनासंबधी भ्रमनिरासाची जाणीव व्यक्त करणाऱ्या आहेत. सारी आबादानी सरली, कात्र्याकुस्यांनी पाय भरले, संसाराचा चोळामोळा झाला, खेडयाकडे चला, कोणासाठी, कशासाठी? अडाइयांचा हाती जोर, काळीभोर काठी.... कुठे शोधावा माणूस रिते कोस कोस.....असे विषण्ण सूर या संग्रहाच्या प्रारंभीच्या अनेक कवितांत आहेत.

मराठी कवितेत खास महानोरांची कविता म्हणून जी कविता ओळखली जाते, सुरुवातीपासूनच स्वतःच्या ठसा जिनं मराठी कवितेवर उमटविला, अशी कविता दुसऱ्या टप्पात पानझड मध्ये पहावयास मिळते. जीवनाला लालित्य आणि लालिमा प्राप्त करुन देणाऱ्या उन्मादक नि तृप्त अशा प्रीतीचा धुंद अविष्कार करणे हा मनोरांच्या प्रतिभेचा विशेष आहे. खास महानोरी शैलीतल्या निसर्ग आणि प्रीतीच्या भावना व्यक्त करणाऱ्या गीतात्म वचनांची एक माळच हाती येते. चिंब पावसानं रान झालं ओलं आभाळ आलं भेटीला अशा लयधुंद कविता, साजण, रुसला ग, धरिला जाळिमंधी झोंबतो हया गारवा अशी शृंगारिक लावणसदृश रचना यांनी हा संग्रह डवरलेला आहे.

एक सुकुमार नार अन तिचे हजार रुपं त्यांच्या कवितेत येतात. नितळ निळया डोळयाची संसारी मालन, पिवळी हळद सांडणारी तर कधी केसरात न्हालेली गोजिरवाणी मैना येते तर कधी माळयाच्या मळयातली नाजूक मैना जाईच्या फुलांची काचोळी गुंफणारी ... अशी विविध रुपे त्यालेल्या, ओढाळ डोळयांची..... तरुणाईनं ओतप्रोत भरलेली प्राणयिनी येते.

प्रणयाची प्रसन्न पखरण असलेली, शृंगारप्रधान गाणि, काही गर्भश्रीमंत लावण्या पानझड मध्ये आलेल्या आहेत.

भरलं आभाळ पावसाळी पाहुणा गं
बाई श्रावणाचं उन्ह मला झेपेना
पिवळया पंखाचं पक्षी नाव सांगेना ग
बाई श्रावणाचं उन्ह मला झेपेना.
(कविता क्र. ३१)

निसर्गाच पार्श्वभूमीवर वावरणाऱ्या स्त्रीचे सौंदर्य, तिचं सोज्वळ रूप या कवितेमधून त्यांनी टिपलेले आहे. ग्रामीण परिसरातला वेड लावणारा निसर्ग, मोकळा शृंगार, स्त्रीपुरुपांच्या प्रणयाची निगडित सूचक खुणा, मादक वातवरण आणि नादमधुर शब्दांचे रुणझुण पैंजण ऐकणाऱ्या ओळींचे बंध या साऱ्यांतून महानोरांचा बाज पुन्हा एकवास पहावयास मिळतो.

पानझड च्या तिसऱ्या विभागात कविता क्रमांक ७१ ते ९१ हे पालखीचे अभंग आहेत. पालखीचे अभंग ही पानझड ची वैशिष्टयपूर्णता आहे. महानोरांची भूमिनिष्ठा पालखीच्या अभंगातूनही तितक्याच तीव्रतेने व्यक्त झालेली आहे. पानझड मधील पालखीच्या अंभगात वर्तमान जीवनाचे संदर्भ आहेत. पानझड चे दु:ख पचवून पालवीची नवी उमेद जागवणारे पालखीचे अभंग त्यांनी लिहिलेले आहे. चारी अंगाने उजाड झालेल्या मोडक्या मनाचा माणूस शेवटी अध्यात्माचा आधार घेतो, तिच मानसिकता तिसऱ्या गटातील पालखीच्या अंभंगात दिसून येते. पालखीच्या अभंगात काही ठिकाणी संतमंडळीचं सामाजिक ऋण व्यक्त झालेले आहे. तर कधी विठ्ठलाची दु:ख सरावं म्हणून केलेली विनवणी आहे. अभंगात मृगणक्षत्र, विकांचा दरवळ, पाखरांच्या चोची, कुणघ्याचा मळा असे संदर्भ आहेत.

पालखीच्या अभंगात ना.धों. महानोर विठ्ठलाला हाक घालतात महानोर लिहितात.

सूर्य नारायण नित नेमानं उगवा
अंधाराच्या दारी थोडा उजेड पाठवा
किंवा
ओंजळीने भरु देगा
पाखरांच्या चाची
दु:खी पंखांना असो
सावली मायेची

हया प्रार्थनेतील आर्तता आणि मानवतावादी दृष्टिकोन महानोरांच्या मनाचा तळ दाखवणारा आहे. अशा तऱ्हेने अंधाराच्या दारी उजेडाची वाट पाहणारी आणि दु:खातही आपल्या पंखांना मायेच्या सावलीचे बळ मागणारी ही कविता खऱ्याअर्थाने माणसातल्या माणसाचीच कविता आहे आणि म्हणूनच ती महत्वाचीही आहे.

पालखीच्या अभंगाच्या शेवटी पसायदानाच्या पध्दतीने लिहिलेली प्रार्थना सर्वात शेवटी आहे. महानोर लिहितात.

आबादानी होवो
शेत भरु दे दाण्याचे
तुझ्या पालखीला
शब्द बांधू तुकोबाचे

अशा प्रकारचे पसायदान ना.धों. महानोर कुणब्यांसाठी आणि शेतकऱ्यासाठी विठ्ठलाला मागातात. डॉ. द.ता. भोसले पानझड मधील कवितेच संदर्भात म्हणतात की, निसर्गाची पारदर्शी व चेतोहारी चित्रणे करणारा एक प्रभावी कवी म्हणून पानझड मध्ये महानोर प्रकट झालेले असले तरी त्यांचा हा संग्रह जीवनशोध, अनुभवाचे सखोल नि विस्तृत दर्शन घडवित आणि कवितेच्या लोकप्रियतेच्या चौकटीत न अडकता नवे नवे प्रयोग करीत वाचकांना अनुभवांची समृध्दी देत एक मैलिक योगदान ठरणारा आहे. नव्या पालवीचे आश्वासन देणारी ही पानझड आहे. आत्मशोधाचा दिवा विझून देता सौदर्य सरोवराकाठी केलेला मुक्त विहार म्हणजे ही कविता आहे. एकाच वेळी तृप्त करणारी आणि अतृप्तीचा बिंदू काळजावर ठेवून अस्वस्थ करणारी अशी कविता आहे.

थोडक्यात पानझड संग्रहातील कविता उदासवाणे अनुभव निसर्गप्रतिमांतून भेटणारी तर कधी सोज्वळ शृंगारातून दिसणारी स्त्रीरुपे, निसर्गचित्रे सभोवतालचे ग्रामवास्तव आणि पालखीचे अभंग अशा स्वरुपात प्रकटते. लोकगीतांची कवितांत मात्र वेगळेपण जाणवते. पानझड मधील पालखीचे अभंग ग्रामजीवनातील दुष्काळ आपत्ती आणि अध्यात्म एकत्र दर्शन घडवितात. पानझड या कवितासंग्रहात महानोरांची गाजलेली चित्रपट गीते, गीतांच्या वळणाच्या कविता, संतपरंपरेशी जोडणारे आणि मनाला घायाळ करणारे असे पालखीचे अभंग आहेत.